आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. एच ओ/E230
दिनांक :-9L/०९/२०२५

-: कार्यालय परिपत्रक :-

विषय :- जागतिक हृदय दिनानिमित्त आयोजित सीपीआर प्रशिक्षणास उपस्थित रहाणेबाबत.
संदर्भ :- आरोग्य कार्यालय,पुणे महानगरपालिका,आ.क्र.एच.आय.११७२३.दि.१०/०९/२०२५.

दि.२९ सप्टेंबर २०२५ रोजी जागतिक हृदय दिनानिमित्त पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता सीपीआर प्रशिक्षण आयोजित करणेबाबत राष्ट्रीय समन्वयक रिव्हीव्ह हार्ट फाउंडेशन,रोटरी क्लब ऑफ पुणे,लक्ष्मी रोड यांचेकडील संदर्भांकित पत्र आरोग्य कार्यालयाकडे प्राप्त झालेले आहे.

या प्रशिक्षणाचे नेतृत्व प्रख्यात हृदयरोगतज्ञ डॉ.जगदीश हिरेमठ करणार असून ते अनेक वर्षांपासून या उपक्रमाशी संबंधित आहे.

संदर्भांकित पत्राचे अनुषंगाने दि.२९ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ३:३० वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह (जुना जी.बी.हॉल,तिसरा मजला पुणे मनपा मुख्य इमारत) येथे पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता सीपीआर प्रशिक्षण आयोजित करणेत आलेले आहे.

सदर प्रशिक्षणाकरिता पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमधील अधिकारी व कर्मचारी यांनी दि.२९ सप्टेंबर २०२५ रोजी दु.३:३० वा. श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह (जुना जी.बी.हॉल तिसरा मजला,पुणे मनपा,मुख्य इमारत) येथे उपस्थित रहाणेस विनंती आहे.

मा.स.कळावे.

(डॉ.कल्पना बळीवंत)
उप आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

(डॉ.निना बोराडे)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

प्रत :-

१.मा.महापालिका आयुक्त,पुणे महानगरपालिका
२.मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज/ई/वि),पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहितीस्तव...

प्रत :-

१.मा.सर्व खातेप्रमुख/विभागप्रमुख,पुणे महानगरपालिका

यांजकडेस आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी...